## पान 1 वरुन

या बढत्यांना आणि बदल्यांना तत्काळ स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री फडणवीस यांचा हा निर्णय म्हणजे, आपल्याच पक्षातील निकटवर्तीय मंत्री गिरीश महाजनांसह ज्येष्ठ मंत्री विखे पाटलांना दणका असल्याची चर्चा आता रंगली आहे.मंत्री गिरीश महाजन यांच्या जलसंपदामंत्री म्हणून विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे जलसंपदामंत्री म्हणून गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचा कारभार आहे. कृषी आधारित अर्थव्यवस्था असलेल्या महाराष्ट्रात जलसंपदा हे खाते अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. या खात्याअंतर्गत शेतकऱ्यांसाठी अनेक कामे हाती घेतली जातात.उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या 2025-26 सालच्या अर्थसंकल्पात जलसंपदा विभागासाठी 15,932 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळेच या विभागात इंजिनिअरपदी वर्णी लागावी, यासाठी अनेकांची धडपड असते. तशी 'फिल्डिंग' देखील लावली जाते. यासाठी 'अर्थपूर्ण' व्यवहार देखील होत असल्याची चर्चा असते.राधाकृष्ण विखे-पाटील यांचे पुत्र सुजय विखे पाटील यांच्याबरोबरच गिरीश महाजन यांचा मनमानीपणा कारभाराचे किस्से मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या कानापर्यंत पोचल्याची चर्चा आहे. यातूनच हा बदली आणि बढत्यांमध्ये मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातल्याचे सांगितले जाते. प्रधान सचिव दीपक कपूर यांनी देखील याबाबत मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे यात लक्ष घालत, मुख्यमंत्र्यांनी अखेर या बढत्या आणि बदल्यांना स्थगिती दिल्याचे समजते.

-------------------------------------

ठाण्याचे नायब तहसीलदार दिनेश पैठणकर यांनी एबीपी माझाला माहिती दिली. दरम्यान जखमींवर कळवा आणि मुंब्र्यातील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. 10 जखमींपैकी एकाचा मृत्यू झाल्याची माहिती कळवा रुग्णालयाने दिली. तर कळव्यातील काही जखमींना ठाण्याच्या ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सदर अपघात झाला तेव्हा सुरुवातीला पुष्पक एक्सप्रेसमधून प्रवासी खाली पडल्याची माहिती सांगण्यात येत होती. मात्र पुष्पक एक्सप्रेसचा काहीही संबंध नसल्याची माहिती मध्य रेल्वेचे माहिती अधिकारी स्वप्नील निला यांनी दिली. लोकलमधून प्रवासी फूटओव्हरवरुन प्रवास करत होते. एका ट्रॅकवरुन सीएसएमटीकडे लोकल जात होती. तर दुसऱ्या ट्रॅकवरुन कसाराच्या दिशेने लोकल जात होती. यावेळी दोन्ही लोकलमधील दरवाजावरील प्रवाशांची बॅग एकमेकांना घासली गेली. सकाळी 9.30 वाजता ही दुर्घटना घडली आणि 9.50 पर्यंत ॲम्युबलन्स दाखल झाल्या आहेत आणि रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आलेली आहे, अशी माहिती स्वप्नील निला यांनी दिली. मुंब्रा आणि दिवा दरम्यान ही घटना घडली. अप आणि डाऊन दरम्यानच्या लोकल दरम्यान प्रवासी फूटओव्हरवरुन प्रवास करत होते. अशात त्यांची टक्कर झाली किंवा बॅग लागला आणि धक्का लागला त्यामुळे ही 8 लोकं खाली पडलीत. रेल्वेने उपाययोजना करण्यासंदर्भातच नव्या लाईनचे नियोजन केले आहेत. ठाणे ते सीएसएमटी सहाव्या लाईनपर्यंत अपग्रेड करणार आहोत. कार्यालयांना देखील विनंती केली होती की कार्यालयातील वेळेमध्ये केले तर चांगलं होईल. लोकांचा देखील सहयोग गरजेचा आहे, उपाययोजना आपण करत आहोत. पश्चिम आणि मध्यमध्ये अनेक गोष्टी वेगळ्या आहेत. मध्य रेल्वेची फ्रिक्वेन्सी अधिक आहेत, ब्रिज आणि टनेल अधिक आहेत.जखमी व्यक्तीची माहिती खालील प्रमाणे:

1) श्री. शिवा गवळी (पुरुष 23 वर्ष/यांची प्रकृती चिंताजनक असल्याने छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथून ज्युपिटर हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले आहे.)

2) आदेश भोईर (पु/26 वर्ष, राहणार: आढगाव, कसारा, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरु आहेत.)

3) रिहान शेख (पु/26 वर्ष, राहणार: भिवंडी, प्रवास: कल्याण ते ठाणे, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरु आहेत)

4) अनिल मोरे (पुरुष 40 वर्ष, यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना उपचारासाठी ज्युपिटर हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले आहे.)

5) तुषार भगत (पु/22 वर्ष, प्रवास: टिटवाळा ते ठाणे, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरु आहेत.)

6) मनीष सरोज (पु/26 वर्ष, पत्ता: दिवा साबेगाव, दिवा यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरु आहेत)

7) मच्छिंद्र गोतारणे (पु/39 वर्ष, राहणार: वाशिंद, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरु आहेत)

8) स्नेहा धोंडे (स्त्री/21वर्ष, राहणार: टिटवाळा, प्रवास: टिटवाळा ते ठाणे यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरु आहेत)

9) प्रियंका भाटिया (स्त्री/26 वर्ष, राहणार: शहाड, कल्याण यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरु आहेत)

---------------------------------------

व्यक्त करण्यात आला. विशेष म्हणजे आंदोलनात सहभागी झालेले स्थानिक पदाधिकारी हे सत्ताधारी पक्षाचे असून महायुतीमधील तिन्ही पक्षाचे पदाधिकारी आहेत. त्यामुळे, विरोधी पक्षातील आमदाराविरुद्ध ही स्थानिक नेतेमंडळी एकत्र येऊन संताप व्यक्त करत आहे.

जिल्हा परिषद, पीडब्लूडी विभागाची कामे अडवली आहेत. कार्यकारी अभियंता तोंडे, उप कार्यकारी अभियंता बोराडे आणि ज्युनिअर इंजिनिअर ठाकूर हे तिन्ही अधिकारी आमदार संदीप क्षीरसागर यांनी घरगडी म्हणून घरी ठेवले आहेत. या अधिकाऱ्यांना मंत्र्यांच फोन गेले, पालकमंत्र्यांचे फोन गेले तरीही अधिकारी काम ऐकत नाहीत, असा आरोपही आंदोलकांनी केला आहे. विशेष म्हणजे, या आंदोलनात महायुतीमधील तिन्ही पक्षातील स्थानिक कार्यकर्त्यांनी आमदार संदीप क्षीरसागर यांच्याविरुद्ध संताप व्यक्त केला.

----------------------------------------

सुखरुप खाली उतरविले. यामुळे पुढील अनर्थ टळला आहे. त्यानंतर अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी हजर झाली परंतु तो पर्यंत पूर्ण एसटी ही जळून भस्मात झालेली होती. या अपघातात तीन ते चार प्रवासी हे किरकोळ जखमी झालेले आहेत.

--------------------------------------------

करत असल्याचे देखील यात समोर आले आहे.

बालविवाह करण्यास कायद्याने गुन्हा आहे. मात्र कायद्याला न जुमानता अनेकजण मुलांचे कमी वयात विवाह उरकण्याचा तयारीत असतात. अर्थात बीड जिल्ह्यात जितके बालविवाह रोखण्यात यश मिळाले आहे. त्यापेक्षा अधिक बालविवाह झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. बीड जिल्ह्यासाठी सध्या ही बिकट परिस्थिती आहे. आकडा कमी होण्याऐवजी वाढत चालला आहे. त्यासाठी चिंतेची बाब आहे.बीड जिल्ह्यात या वर्षामध्ये 258 बालविवाह थांबवले आहेत. तर 18 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यात सामाजिक व आर्थिक परिस्थिती पाहता बीड जिल्ह्यात बालविवाह होताना पाहायला मिळत आहेत. जेवढी जास्त जनजागृती होईल, तेवढ्या तक्रारी जास्त येत आहेत. ज्या मुलींचे बालविवाह झाले आहेत. या मागची मूळ कारणे म्हणजे स्थलांतर, गरिबी, सिंगल कुटुंब ही एक समस्या आहे. नोकरदार चांगला मुलगा आला, तर लग्न लावून दिले जातात. मुलींची संख्या कमी असल्यामुळे पैसे देऊन देखील विवाह करतात. दरम्यान बीड जिल्ह्यात पाहायला गेलं तर ग्रामीण भागासह शहरी भागात देखील मोठ्या प्रमाणात बालविवाह होत असल्याचे निदर्शनास येत आहे. अनेक वेळा प्रशासनाकडून आव्हान केलं तरीही लोक ऐकत नाहीत. त्यामुळे ही समस्या कमी होण्यासाठी शासन स्तरावर मात्र उपाययोजना केल्या जातात. त्याचबरोबर बीड जिल्ह्यात जर विवाह नाही झाला; तर दुसऱ्या जिल्ह्यात जाऊन विवाह होत असल्याचा देखील धक्कादायक प्रकार या ठिकाणी समोर आला आहे.

--------------------------------------

या निवडीबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. तसेच परळी येथील सामाजिक कार्यकर्ते सुरज गरड यांनीही त्यांच्या निवडीचे स्वागत केले आहे.

## पान 4 वरुन

अश्व रिंगण सोहळा गुरुवार दिनांक 26 जून 2025 गुरुवार रोजी संपन्न होणार आहे. याच दिवशी शालेय वारकरी समूह दिंडी नृत्य स्पर्धा स्पर्धा दुपारी ठीक बारा वाजता योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानावर प्रारंभ होतील

अंबाजोगाई शहरातील सर्व शाळांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घ्यावी. वारकरी दिंडी मध्ये वारकरी पोशाखा सोबतच विविध संतांचा पोशाख असणे अभिप्रेत आहे. अंबाजोगाई शहरातील सर्व शाळांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या स्पर्धेमध्ये सहभागी करून घ्यावे असे आवाहन भव्य अश्व रिंगण सोहळा संयोजन समितीचे स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा व सचिव तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी केले आहे.

नाव नोंदणीसाठी संपर्क:-

1) श्री. प्रकाश बोरगावकर- 7517664761 2) श्री,बळीराम चोपणे- 7219250999 3) श्री, आनंत अरसुडे- 727618999

----------------------------------------

500 उद्योजक कार्यक्रमाला उपस्थित होते.

श्री. भरत गिते हे बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील ग्रामीण भागातून पुढे आलेले तरुण उद्योजक असून त्यांनी जर्मन कंपनीसोबत भागीदारी करत तौरल इंडिया या आघाडीच्या कंपनीची स्थापना केली. ॲल्युमिनियम ऑटो पार्ट्स, रेल्वे, ऊर्जा आणि संरक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या या कंपनीद्वारे त्यांनी हजारो युवकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळेच त्यांना 'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून देखील ओळखले जाते.श्री. गिते यांनी अलीकडेच दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्र सरकारसोबत 500 कोटी रुपयांचा सामंजस्य करार (MoU) केला होता. या अंतर्गत आहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा येथे अत्याधुनिक उत्पादन प्रकल्प उभारला जाणार असून, यामुळे मराठवाड्यासह राज्यातील हजारो तरुणांसाठी रोजगार निर्मिती होणार आहे.या कार्यक्रमात बोलताना उद्योगमंत्री मा. श्री. उदय सामंत यांनी श्री. भरत गिते यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, "भरत गिते हे महाराष्ट्राच्या तरुणाईचे खरे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळवून दिले आहे."या कार्यक्रमात उद्योगमंत्री मा. श्री. उदय सामंत यांनीच जर्मनीतील उद्योजकांसाठी महाराष्ट्रातील MIDC मध्ये 500 एकर जमीन राखीव ठेवण्याची अधिकृत घोषणा केली. यासोबतच अनिवासी महाराष्ट्रीय (NRM) नागरिकांसाठी 100 एकर औद्योगिक भूखंड राखीव ठेवला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

श्री. भरत गिते यांचा युरोपमध्ये झालेला सन्मान हा महाराष्ट्रासाठी औद्योगिक विकासाच्या दृष्टीने एक ऐतिहासिक क्षण ठरला असून, यामुळे भविष्यातील परदेशी गुंतवणुकीचे दरवाजे अधिक उघडतील याची खात्री आहे.मराठवाड्याच्या बीड जिल्ह्यातील एका ग्रामीण युवकाचा हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील सन्मान संपूर्ण राज्यासाठी अभिमानास्पद आहे. भरत गिते हे हजारो तरुणांसाठी संघर्ष, मेहनत आणि जिद्दीचे खरेखुरे प्रेरणास्थान आहेत.

-------------------------------------

व पार्वती यांचा विवाह, त्यांच्या तपश्चर्येचे महानत्व आणि जगत् कल्याणासाठी घेतलेले विविध अवतार या संदर्भातील प्रसंग त्यांनी संपूर्ण श्रद्धा आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने उलगडले.

"शिवतत्त्व हे केवळ पुराणातले पात्र नाही, तर ते जीवनाचा आत्मा आहे. जीवनात संयम, सेवा, त्याग आणि शांती जोपासणं, हेच खरं शिवत्वाचं आचरण आहे. ही कथा केवळ ऐकण्याची गोष्ट नाही, ती जगण्याची प्रेरणा आहे," असे उद्गार जनाई महाराज यांनी या प्रसंगी काढले. त्यांच्या या विचारांनी श्रोत्यांच्या मनात आत्मपरीक्षण आणि आध्यात्मिक ऊर्जेचा संचार घडवला.

शिवमहापुराण कथेसाठी परळी शहरासह परिसरातूनही भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची, युवकांची आणि वारकरी बांधवांची विशेष उपस्थिती लक्षणीय होती. काही भाविकांनी ही कथा सतत सहा दिवसांपासून रोज उपस्थित राहून अनुभवली आहे. यामुळे या कार्यक्रमाचे धार्मिक व सामाजिक महत्त्व अधिकच अधोरेखित होत आहे.

कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन अतिशय नियोजनबद्ध असून, स्थानिक वारकरी मंडळ, संकट मोचन हनुमान मंदिर ट्रस्ट, स्वयंसेवक मंडळी, आणि परळीतील भक्तगण यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. भक्तांसाठी बसण्याची उत्तम व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, तसेच शिस्तबद्ध कार्यक्रम व्यवस्थापन यामुळे हा अध्यात्मिक सोहळा अधिक प्रेरणादायी ठरत आहे.

---------------------------------------

खते, बियाणे, औषधी, दर्जेदार मिळणे. डी.ए.पी. खते वेळेवर उपलब्ध करून देणे. पोर्टल अंतर्गत नोंदणी केलेले बियाणे नियमानुसार वाटप करण्यात यावेत.

शेत रस्ते व पांदन रस्त्याचे प्रलंबित प्रश्न तात्काळ मार्गी लावावेत. सन 2024-25 च्या पिकविमा भरपाईची उर्वरित 75 % रक्कम तात्काळ वाटप करावी या मागन्या निवेदन द्वारा करण्यात आले अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे , जेष्ठ नेते उत्तम माने , हनुमंत फड ,शहराध्यक्ष कल्पना देशमुख,प्रमोद किरवले ,अनंत तिड़के,राजेभाऊ फड़, वर्षाताई रायभोळे, बाबासाहेब गव्हाणे, गोविंद देशमुख, माऊली इंगळे, डॉ. माणिक कांबळे, डॉ.संदीपान काळे, डॉ.जानमोहम्मद शेख, प्रल्हाद गित्ते, दिलीप सुरवसे, अशोक कदम, बाळू कोंढरे, भीमराव हाके, विष्णू ढिकले, अमोल वाघमारे, शिवाजी लोमटे अनिल माने,शिवाजी देशमुख,अंकुश माने सह आदि उपस्तिथ होते.

------------------------------------

सरपंच धनेश्वर खेत्रे, दत्ता जाधव, रोहित जाधव, सिद्धार्थ जाधव, राजाभाऊ नवले, लकी कंडेरे, राजू टाक, सुमंत राऊत, नामदेव म्हेत्रे, सखाराम राऊत, सचिन उनवणे यांच्यासह अनेकजण सहभागी झाले होते.

ॲड. राजेंद्र राऊत यांनी म्हटले की, आ.संदीप क्षीरसागर यांच्या दबावतंत्रामुळे अधिकारी रस्त्याचे मार्कआऊट देत नसून रस्त्याचे काम रखडले आहे. त्यामुळे आमदारांसह अधिकार्यांचा निषेध करण्यासाठी आंदोलन करत असल्याचे सांगितले. बीड तालुक्यातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील नाळवंडी ते मौज व्ही.आर.क्र. 243 काळेगाव हवेली ते लमाण तांडा रस्ता व्ही.आर. 354, ओडीआर 50 ते मानकुरवाडी रस्ता व्ही.आर. 37, पाली ते वरवटी इजिमा 127, पाली ते वरवटी इजिमा 127 यांसह इतर अनेक रस्ते सुधारणा अंतर्गत कामे आहेत. सदर रस्ते हे जिल्हा नियोजनमधून सन 2024 या वर्षामध्ये मंजूर आहेत. सदर रस्त्याचे कार्यारंभ आदेश 6 महिन्यांपूर्वी झालेले आहेत. या रस्त्याचे काम सन 2024 मध्ये जिल्हा नियोजन समितीमार्फत मंजूर झाले असून, डिसेंबर 2024 मध्ये कामाचे कार्यारंभ आदेश निघाले आहेत. मात्र, बीडमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता, उपअभियंत्यांकडून अद्यापही कामाचे मार्कआऊट देण्यात आलेले नाहीत. आ.संदीप क्षीरसागर यांना ज्या भागातून अल्प मतदान झाले, त्या त्या भागातील कामे थांबवण्यात येत असल्याचा आरोप सरपंच ड.राऊत यांनी केला आहे. यापूर्वीही त्यांनी अनेक विकासकामात खोडा घातला, परंतु यापुढे त्यांची मनमानी सहन केली जाणार नाही, त्यांच्याविरोधात वेळोवेळी आवाज उठविला जाईल, असा इशाराही ड.राऊत यांनी दिला आहे. दरम्यान, मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना देण्यात आले. यावेळी बीड तालुक्यातील अनेक गावचे सरपंच, पदाधिकारी, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

--------------------------------------

उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे काम तात्काळ थांबवण्याची मागणी केली होती.

उपविभागीय अधिकारी श्री. लाटकर यांनी या निवेदनाची गंभीर दखल घेत नगरपरिषद परळी येथे विशेष बैठक घेऊन काम तात्पुरते थांबवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे संत पालख्या निर्धारित मार्गावरून कोणताही अडथळा न होता श्री वैजनाथ दर्शनासाठी पोहोचू शकतील, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

या निर्णयाबद्दल शिवसेनेच्यावतीने श्री. लाटकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना युवा नेते प्रा. अतुल दुबे, सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये, वैजनाथ माने, शिवसेना तळ विभाग प्रमुख श्रीनिवास सावजी, युवासेना माजी उप जिल्हाप्रमुख मोहन परदेशी, शहर संघटक संजय कुकडे, सुधाकर वाघमारे, कारभारी शिंदे यांच्यासह अनेक शिवसैनिक व नागरिक उपस्थित होते.

शिवसेनेचे माजी नगराध्यक्ष अभयकुमार ठक्कर यांनी यावेळी बोलताना सांगितले की, "जनहिताच्या दृष्टीने प्रशासनाने घेतलेला हा निर्णय प्रशंसनीय असून, भविष्यातही असेच सहकार्य मिळावे हीच अपेक्षा असल्याचे ते म्हणाले.

----------------------------------------

मार्ग मिळाल्याशिवाय राहणार नाही. सुरेश वानखडे सर यांनी या व्याख्यानाचे सुंदर असे आयोजन केले होते. यावेळी अजयकुमार गंडले यांनी विस्तृत असा बौद्ध धम्म आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिताताई दिघाडे यांनी केले.ध्यान साधना महेंद्र गजभिये सर तर

आभार अशोक वाघमारे सर यांनी मानले. कार्यक्रमास संजय श्रीरामे, कुंदाताई बनसोड, वंदनाताई शेंडे, सुरेंद्र मनोहर, व्यंकट कांबळे, मधुकरराव जाधव सर यासह अनेक बौद्ध उपासक, उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------------------------------

इसमाची घालमेल उत्तमरित्या पडद्यावर साकारली आहे. या लघुपटाचे पटकथा लेखन हे लेखक आर.प्रकाश यांनी केले असुन ध्वनी व कला दिग्दर्शन सौरभ धापसे व निकेश भांगे यांनी केले आहे. 'टॉस' हा प्रयोगशील लघुपट कमी बजेट व कमी संसाधनामध्ये तयार केला असल्याचे समजते. त्यामुळे या यशासाठी सर्व स्तरातुन 'टॉस' च्या टिमचे अभिनंदन होत आहे.

----------------------------------

गोपनपाळे गल्लीतील भुयारी गटार योजनेचीही पाहणी करण्यात आली. तसेच हनुमान व्यायाम शाळेजवळील फुटलेली पाईपलाईन आणि सरस्वती नदीतील साचलेला गाळ व कचरा मुख्याधिकारी साहेबांच्या निदर्शनास आणून देण्यात आला.

मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे साहेब यांनी स्वच्छता निरीक्षक शंकर साळवे यांना उद्याच स्वच्छतेचे काम सुरु करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.यावेळी नगरपरिषदचे विक्रम स्वामी, शिवसेनेचे सचिन स्वामी, युवा नेते चंद्रप्रकाश हालगे व लहु हालगे उपस्थित होते.

"नांदुरवेस परिसरातील नागरिकांनी अनेक दिवसांपासून ही तक्रार केली होती. आता यावर तातडीने उपाययोजना होणार आहेत. काम वेळेत पूर्ण व्हावे हीच माझी अपेक्षा आहे," असे प्रतिपादन मा. नगरसेवक अनिल अष्टेकर यांनी यावेळी केले.

------------------------------------

गोपनपाळे गल्लीतील भुयारी गटार योजनेचीही पाहणी करण्यात आली. तसेच हनुमान व्यायाम शाळेजवळील फुटलेली पाईपलाईन आणि सरस्वती नदीतील साचलेला गाळ व कचरा मुख्याधिकारी साहेबांच्या निदर्शनास आणून देण्यात आला.

मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे साहेब यांनी स्वच्छता निरीक्षक शंकर साळवे यांना उद्याच स्वच्छतेचे काम सुरु करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.यावेळी नगरपरिषदचे विक्रम स्वामी, शिवसेनेचे सचिन स्वामी, युवा नेते चंद्रप्रकाश हालगे व लहु हालगे उपस्थित होते.

"नांदुरवेस परिसरातील नागरिकांनी अनेक दिवसांपासून ही तक्रार केली होती. आता यावर तातडीने उपाययोजना होणार आहेत. काम वेळेत पूर्ण व्हावे हीच माझी अपेक्षा आहे," असे प्रतिपादन मा. नगरसेवक अनिल अष्टेकर यांनी यावेळी केले.

--------------------------------------------

सरचिटणीस भाई जयंत पाटील साहेब यांनी केली. पक्ष बांधणी संदर्भात नवीन चेहऱ्यांना संधी देणार असल्याचे वक्तव्य जयंत पाटील यांनी बोलुन दाखवले.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते प्रा एस व्ही जाधव होते कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून पक्षाचे सहचिटणीस भाई बाबासाहेब देवकर, महिला आघाडीच्या ॲड मानसी म्हात्रे ,भाई बाबुरावजी लागारे ,चित्रलेखा गोळेगावकर नारायण गोले पाटील, भाई उदय गवारे, विष्णुपंत घोलप, ॲड गोविंद डुमणे, बाळासाहेब धस यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी, तुषार गोळेगावर ,किरण खपले, अमोल दिक्षीत, उत्तम अमृतराव, सुशिल सोमवंशी, राजाराम रसाळ, आसद बल्खी, शिवाजी सुरवसे, राजु सुरनर, यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेळावा समन्वयक भाई मोहन गुंड यांनी केले, सुत्रसंचलन हनुमंत घाडगे सर यांनी केले

तर आभार प्रा उमाकांत राठोड यांनी केले. अशोक रोडे ॲड निखिल बचुटे मुंजा पांचाळ मंगेश देशमुख यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले..

---------------------------------

जोगदंड श्री ह.भ. प.हरिदास भाऊ जोगदंड, शिवानंद महाराज गिरी यांच्यासह हजारो भावी फक्त उपस्थित होते.

बीडच्या श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभूती ज्ञानेश्वर दादा माऊली यांच्या रोप्य महोत्सवी पुण्यतिथी उत्सवात दुसर्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प प्रकाश महाराज बोधले यांनी वाहिले..

यावेळी संत तुकाराम महाराज यांच्या तुमचिये दासींचा दास करुनि ठेवा । आशीर्वाद द्यावा हाचि मज ॥1॥

नवविधा काय बोलली जी भक्ती । घ्यावी माझ्या हातीं संतजनीं ॥2॥

तुका म्हणे तुमच्या पायांच्या आधारें । उत्तरेन खरें भवनदी ॥3॥

या अभंगावर चिंतन मांडले यावेळी पुढे बोलताना महाराज म्हणाले की मराठवाड्यामध्ये वारकरी संप्रदाय प्रचार प्रसाराचे काम दादा माऊलींनी मोठ्या प्रमाणात केली त्यांनी संपूर्ण आयुष्य जनसामान्यांच्या उद्धारासाठी खर्च केले. त्यामुळेच आज हा वैभवशाली सोहळा होत आहे..

पुढे बोलताना महाराज म्हणाले की जगातील प्रत्येक माणूस स्वार्थी त्यागी माणूस आजपर्यंत जन्माला आलेला नाही. संतही मागतात देवही मागतो आणि जीवही मागतो.. प्रत्येकाची मागणी वेगवेगळ्या असते..नको ब्रम्ह ज्ञान आत्मस्थिती भाव... साधू भक्ती प्रेम मागतात. परमार्थ चांगला सुरु असेल तर देव संसारातील काही तरी गोष्ट अनुकूल करतो जीव त्यात अडकतोया अभंगात संताकडे आशीर्वाद मागतात. राजाकडे वैभव मागावे. संताकडे आशीर्वाद मागावा. आशीर्वादामध्ये खूप मोठी ताकद असते..प्रतिज्ञा ही शक्ती ने केली जाते... आशीर्वाद हा देणार्यांच्या अंतकरणाच्या समाधानाचा भाव असतो.. या अभंगांमध्ये जगद्गुरु तुकाराम महाराज संतांच्या दाशीचा तास करण्याची मागणी करतात. भक्ती काय आहे ही संतांनीच सांगितली पाहिजे.. कारण संत अनुभवाला आणून देतात.आपल्याला भक्ती कशी करवी हे माऊलींच्या पुण्यतिथी उत्सवात कळते. संतांच्या पायाच्या आधारानेच भव नदी तरुण जाता येते असे महाराज म्हणाले.

कीर्तनात साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंग वादक राम महाराज काजळे, गायनाचार्य बिबीशन महाराज कोकाटे ओंकार महाराज जगताप ,अभिमान महाराज ढाकणे, विष्णु महाराज, संजय महाराज देवकर, माऊली महाराज आवटे यांच्यासह शेकडो टाळकरी मंडळी उपस्थित होते.

-------------------------------------

पोलिस हेडकॉन्स्टेबल उमेश आघाव यांनी विहिरीत बुडून मृत्य झालेल्या कु. अंजली मोरे हिचे प्रेत केज येथील उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीत तपासणी व शव विच्छेदनासाठी आणले आहे.

-------------------------------------

# पाकिस्तानला प्रथम वर्ल्ड बँकेचे कर्ज;आता आशियाई बॅंकेचे कर्ज कुठे गेले आतंकवाद विरोधी देश?

पहलगाम हल्ल्यानंतर जगातील अनेक देशांनी आतंकवादी हल्ल्याची निंदा केली होती.सोबतच यात पाकिस्ताचा हात असल्याचे जगजाहीर असल्याने अनेक देशांनी पाकिस्तानची सुध्दा निंदा केली.फक्त चीन,बांगलादेश आणि तुर्की यांनी पाकिस्तानला खुले समर्थ केले होते आणि पाकिस्तानच्या घृणास्पद कारवाईच्या विरोधात संपूर्ण देश भारताच्या समर्थनार्थ उभे असल्याचे सांगण्यात आले होते आणि तसे दिसत सुध्दा होते.परंतु ऑपरेशन सिन्दुरच्या कारवाईमध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले.यात आतंकवाद्याचे अड्डे व पाकिस्तानचे एअर बेस उध्वस्त करण्यात आले.यात पाकिस्तानला अरबो रुपयांचे नुकसान सहन करावे लागले. पाकिस्तान आतंकवाद्यांचे माहेरघर आहे ही बाब अमेरिकेसह जगाला माहीत असतांना सुध्दा अमेरिकेने पाकिस्तानला वर्ल्ड बॅंकेकडुन कर्ज मिळावे यासाठी पुढाकार घेतला व पाकिस्तानला ताबडतोब आय.एम.एफ. या वर्ल्ड बॅंकेने 1 अरब अमेरिकन डॉलरचे कर्ज दिले आणि हे कर्ज मंजूर करण्यात अमेरिकेसह जगातील अनेक देशांचा हात असल्याचे स्पष्ट दिसून आले.म्हणजे अमेरिका भारतासह जगाला सांगतो की आम्ही आतंकवाद्यांच्या विरोधात खंबीरपणे उभे आहोत. परंतु अमेरिका पाकिस्तानला मदत करून भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम करतो त्यामुळे आज अमेरिका विश्वासपात्र देश रहाला नाही. आतंकवाद्यांची फॅक्टरी समजल्या जाणाऱ्या पाकिस्तानला अमेरिका नेहमीच खतपाणी घालून खुला सपोर्ट करतो व सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन सुध्दा देत असतो ही जगाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.अमेरिका नेहमी प्रमाणे आताही दोगली नितीचा वापर करीत आहे.भारत-पाक संघर्ष सुरु असतांनाच आय.एम. एफ.ने पाकिस्तानला ताबडतोब 1 अरब अमेरिकन डॉलरची मदत केली आणि हे कर्ज देण्याचे काम अमेरिकेच्याच मदतीने झाले आहे.आय.एम. एफ.चे पुर्वीचे कर्ज अजुनपर्यंत पाकिस्तानने चुकविलेले नाही तरीही त्याला कर्ज देण्यात आले यावर भारत सरकारने नाराजी सुध्दा व्यक्त केली आहे ही बाब जगाला का दिसत नाही!आयएमएफ या वर्ल्ड बॅंकेने 1 अरब अमेरिकन डॉलरचे कर्ज देऊन एक महिना सुध्दा व्हायचा आहे;तर आशियाई विकास बॅंक (एडीबी) ने पाकिस्तानला 80 कोटी डॉलरचे कर्ज 4 जून 2025 ला मंजूर केले ही अत्यंत दुर्भाग्यपुर्ण बाब आहे. पाकिस्तानकडुन आर्थिक मदतीचा दुरुपयोग होण्याची शक्यता भारताने व्यक्त केलेली चिंता नजरे आड करून आशियाई विकास बॅंकेने (एडीबी) पाकिस्तानला तब्बल 80 कोटी डॉलरचे कर्ज मंजूर केले ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.हेही तीतकेच सत्य आहे की पाकिस्तानला आतापर्यंत मिळालेल्या कर्जाची 90 टक्के रक्कम ही आतंकवाद्यांसाठी खर्च होणार आहे आणि 10 टक्के रक्कम पाकिस्तानी जनतेसाठी.एडीबी चे अध्यक्ष मसाटो कांडा यांनी 1 जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली होती आणि 4 जूनला एडीबी ने कर्ज मंजूर केले यावरुन स्पष्ट होते की जगातील देशांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहे हे स्पष्ट दिसुन आले.पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जगातील अनेक देशांना भेटी दिल्या आणि जागतिक पातळीवर आपली बाजू मजबूत करण्याचा प्रयत्न सुध्दा केला.परंतु जेव्हा पाकिस्तानला अलगथलग पाडण्याची वेळ आली तेव्हा जगातील अनेक देश प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रित्या पाकिस्तानच्या बाजूने उभे आहे ही बाब आयएमएफ व एडीबी बॅंकेने मंजूर केलेल्या कर्जावरुन स्पष्ट लक्षात येते.कारण जगातील अनेक देश या बॅंकांचे सदस्य आहेत परंतु पाकिस्तानला कर्ज देण्याचा विरोधी कोणीच का केला नाही? असे अनेक प्रश्न स्वतःला आतंकवाद विरोधी म्हणणाऱ्या देशासमोर उपस्थित होतात.यावरुन स्पष्ट होते की भारताचे शत्रू पाकिस्तान,चीन, बांगलादेश, तुर्की हेच एकटे नसुन अनेक शत्रू आहेत ही बाब पाकिस्तानला दिलेल्या कर्जावरुन स्पष्ट होते.महत्वाचे म्हणजे पाकिस्तानने आतापर्यंत घेतलेल्या कोणत्याही बॅंकेचे कर्ज अजूनपर्यंत परत केलेले नाही तरीही त्याला जगातील अनेक देश कर्ज मिळवून देण्यासाठी सहकार्य करतात ही बाब जागतिक बॅंकेने दिलेल्या कर्जावरुन स्पष्ट होते.यावरुन स्पष्ट होते की जगातील अनेक देश दिखावा म्हणून भारतासोबत असल्याचे दिसून येते.कारण पाकिस्तानला दिल्या जाणाऱ्या कर्जाचा विरोध फक्त एकट्या भारतानेच केला व बाकीच्यांनी फक्त बघ्याची भूमिका घेतली. माझ्या माहितीनुसार भारताचा होत असलेला विकास इतर देशांना पहावल्या जात नाही.त्यामुळे कर्जाच्या माध्यमातून जगातील भारत विरोधी देश अप्रत्यक्षरीत्या कर्जाच्या माध्यमातून पाकिस्तानला मदत करीत असावेत.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.9921690779, नागपूर.**

हॅलो बीड
संघर्षनेता
मंगळवार दि. 10 जुन 2025

# भावी पिढी सुसंस्कारित होण्यासाठी वारकरी दिंडी नृत्य स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा-

## स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा



अंबाजोगाई (प्रतिनिधी) सर्व भाविक भक्तांना शालेय विद्यार्थ्यांना व पालकांना कळविण्यात येते की प्रतिवर्षाप्रमाणे आषाढी वारी निमित्त संत श्रेष्ठ नामदेव महाराज नरसी नामदेव व संत श्रेष्ठ जनाबाई गंगाखेड यांच्यासह अनेक पालख्या या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करतात यानिमित्ताने संपूर्ण मराठवाड्यातील पहिले ऐतिहासिक भव्य अश्व रिंगण आपल्या अंबाजोगाई मध्ये संपन्न होत आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या भव्य मैदानावर पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या गटांमध्ये भव्य वारकरी दिंडी स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे.

आपल्या लहान मुलांवर भारतीय संस्कृतीचे विशेष करून वारकरी सांप्रदायाचे संस्कार रुजावेत. तसेच वारकरी संप्रदायाच्या शिकवणीप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये सर्वधर्मसमभाव जोपासला जावा, त्यांच्यामध्ये नेतृत्व गुण विकसित व्हावेत, सर्वांना सोबत घेऊन चालण्याची सत्प्रवृत्ती निर्माण व्हावी यासाठी या स्पर्धेचे विशेष करून आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेसाठी तिन्ही गटांमध्ये प्रथम पारितोषिक 3100/- रुपये स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र द्वितीय पारितोषिक 2001/- रुपये स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र तृतीय पारितोषिक 1001/- रुपये स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र उत्तेजनार्थ 500/- रुपये प्रमाणपत्र प्रत्येकी दोन याप्रमाणे ठेवण्यात आलेले आहेत. हजारो वारकरी व भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये भव्य पान 3 वर

# महाराष्ट्र-युरोप बिझनेस फोरम यांच्यावतीने फ्रँकफर्ट (जर्मनी) येथे भरत गिते यांना 'बिझनेस आयकॉन ऑफ द इयर 2025' पुरस्काराने सन्मान






फ्रँकफर्ट (जर्मनी) येथे पार पडलेल्या महाराष्ट्र-युरोप बिजनेस फोरम च्या विशेष कार्यक्रमात महाराष्ट्रातील तरुण उद्योजक आणि तौरल इंडिया कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. भरत गिते यांना प्रतिष्ठित 'बिझनेस आयकॉन ऑफ द इयर 2025' या पुरस्काराने गौरवण्यात आले. हा पुरस्कार प्रदान करण्यात आला महाराष्ट्राचे उद्योगमंत्री मा. श्री. उदय सामंत, MIDC चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.वेलारासु एन., तसेच इंडियन कौन्सिल जनरल फ्रँकफर्टचे श्री. बी. एस. मुबारक यांच्या हस्ते.

हा कार्यक्रम महाराष्ट्र सरकारच्या उद्योग विभागाच्या शिष्टमंडळाच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. मा. उद्योगमंत्री श्री. उदय सामंत यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र शासकीय प्रतिनिधीमंडळ फ्रँकफर्ट येथे गेले होते. या 'महाराष्ट्र बिझनेस डे 2025' कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र - युरोप बिझनेस फोरम आणि इंडियन कौन्सिल जनरल फ्रँकफर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. महाराष्ट्र आणि जर्मनी येथील नामवंत कंपन्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला असून सुमारे पान 3 वर

# "शिवतत्त्व हे जीवनाचा आत्मा आहे; त्याचे आचरण हीच खरी पूजा" – ह. भ. प. जनाई महाराज कोकाटे

## ➡ परळीतील शिवमहापुराण कथेस भाविकांची अलोट गर्दी



परळी वैजनाथ (प्रतिनिधी): संकट मोचन हनुमान मंदिर, परळी वैजनाथ येथे अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या वतीने सुरु असलेल्या शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञाचा सहावा दिवस भक्तिभावाने, अध्यात्मिक वातावरणात आणि हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन ह. भ. प. रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या सौजन्याने व मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, या कथा सोहळ्याला दररोज पंचक्रोशीतील भाविकांची प्रचंड गर्दी उसळत आहे.

ह. भ. प. जनाई महाराज कोकाटे यांनी आपल्या रसाळ, ओजस्वी वाणीतून भक्तांना शिवतत्त्वाचे दर्शन घडवले. महादेवाची विश्वात्मकता, शिव पान 3 वर

### आज शिवार्क, अर्धनारीश्वर व शिव-पार्वती विवाहाचे विशद वर्णन

आज शिव-पार्वती विवाह, अर्धनारीश्वराची महिमा, व शिवार्क तत्त्वज्ञानाचे सखोले विवेचन या विषयांवर विशेष प्रवचन होणार असून, त्या दिवशी देखील भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. उद्या ह भ प तुकाराम महाराज मुंडे शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे व नंतर महाप्रसाद मोठ्या प्रमाणामध्ये होणार आहे तरी सर्व भाविकांनी महाप्रसादाचा व कीर्तनाचा लाभ घ्यावा आरती करताना नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री धनंजय मुंडे साहेब यांच्या वतीने सचिव माननीय श्री प्रदीप जी खाडे, व प्राचार्य अतुलजी दुबे सर यांच्या हस्ते शिव महापुराण कथेची आरती करण्यात आली

# पेरनी पूर्वी शेतकार्याना खत,बियाणे,औषधीचा पुरवठा शेतकऱ्यांना वेळेवर करा

## » राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार चे तहसीलदारांना निवेदन



प्रतिनिधी (परळी वै) तालुक्यातील परळी, सिरसाळा, धर्मापुरी बाजार पेठेतील कृषी सेवा केंद्रा अंतर्गत दर्जेदार खते, बियाणे, औषधी शेतकऱ्यांचे उत्पादन वाढीसाठी वेळेवर मिळणे आवश्यक आहे. सध्या डी.ए.पी. खते मार्केटमध्ये उपलब्ध नसल्यामुळे ऑन मध्ये विक्री होऊ शकते. वेळेवर युरिया उपलब्ध होत नाही. मुदाम दुकानदार तुटवडा दरवर्षी निर्माण करत असतात. या सर्व बाबीवर आपल नियंत्रण व सक्षम टीम कार्यरत असणे आवश्यक आहे. शेतीशी निधडीत शेत रस्ते, व पांदन रस्ते च्या प्रश्नांची वेळेत सोडवणूक करावी. व पोर्टल अंतर्गत नोंदणी झालेल्या बियाणे नियमानुसार शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. पण असे होताना दिसत नाही.

या सह खरीप पेरणीसाठी पान 3 वर

# ग्रामीण रस्त्याची कामे सुरू करण्यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

## » आ.संदीप क्षीरसागरांच्या दबावतंत्रामुळे बीड तालुक्यात रस्त्याची कामे रखडल्याचा आरोप



बीड : तालुक्यातील ग्रामीण भागातील नाळवंडी, पालीसह इतर जिल्हा परिषद गटातील ग्रामीण रस्त्यांची कामे आ.संदीप क्षीरसागर यांनी अडविल्याचा आरोप करत अनेक गावचे सरपंच, पदाधिकार्यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी (दि.9) सकाळी 11 वाजता लक्षवेधी धरणे आंदोलन सुरु केले आहे.

हे आंदोलन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, नाळवंडीचे सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, भाजपचे जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले यांच्या नेतृत्वाखाली सुरु आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, युवा नेते महेश धांडे, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ.लक्ष्मण जाधव, महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड.सतीश शिंदे, भाऊसाहेब डावकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवकचे बीड तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, पंचायत समितीचे माजी सदस्य उत्तरेश्वर सोनवणे, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, अरुण लांडे, प्रदीप गायकवाड, पान 3 वर

# संत पालखी मार्ग मोकळा करण्याच्या निर्णयाबद्दल उपविभागीय अधिकाऱ्यांचे अभिनंदन

## » शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) –यंदाच्या आषाढी यात्रेनिमित्त पंचम ज्योतिर्लिंग श्री वैजनाथ महाराजांच्या दर्शनासाठी येणाऱ्या संतांच्या पालख्यांना अडथळा येऊ नये म्हणून परळीतील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपुलाचे सुरु असलेले काम तात्पुरते थांबवण्याचा सकारात्मक निर्णय घेणाऱ्या उपविभागीय अधिकारी श्री. अरविंद लाटकर यांचा आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

उड्डाणपुलाचे काम दिनांक 26 मे 2025 पासून सुरु करण्यात आले होते. हे काम पालखी मार्गावरच असल्याने भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. यासंदर्भात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे नेते व माजी नगराध्यक्ष मा. अभयकुमार उर्फ पप्पू अण्णा ठक्कर यांनी पान 3 वर

# 10वी 12वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या सत्काराचे साठेनगर येथे आयोजन

परळी वै. (प्रतिनिधी) इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन दि.12.06.2025 रोजी साठेनगर येथील सभागृहामध्ये मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले आहे. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय शाहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.

इयत्ता 10 व 12वी मध्ये 80 टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. त्याकरीता ज्यांना 80 टक्के पेक्षा जास्त गुण आहेत अशा विद्यार्थ्यांनी आपल्या मार्कमेमोची झेरॉक्स प्रत दि. 11 तारखेपर्यंत आयोजकाकडे आणून द्यावी.

सदर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार दि.12 जुन रोजी साठेनगर येथील सभागृहामध्ये करण्यात येणार असून गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शालेय साहित्य देण्यात येणार आहे.

तरी यासाठी 9860594884 या मोबाईलवर संपर्क साधावा व आपले मार्कमेमो झेरॉक्स आणून द्यावी. असे आवाहन आयोजक रमेश मस्के, जितेंद्र मस्के विकास कांबळे ज्ञानोबा मस्के विजय चौरे, संजय शिंदे, विकास कांबळे, अमर उबाळे, गणेश मस्के, संतोष मस्के आदींनी केले आहे. पान 3 वर

# टॉस' ने मारली बाजी

## ➡ पुणे लघुपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट प्रायोगीक लघूपटाचे बक्षिस




माजलगाव / प्रतिनिधी: पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या पंधराव्या पुणे शॉर्ट फिल्म फेस्टीवल-2025 मध्ये ए.डी.फिल्म्स् अंतर्गत तयार झालेला व दिग्दर्शक अमर देवणे यांनी स्वतंत्ररित्या दिग्दर्शीत केलेल्या 'टॉस' या लघुपटाला सर्वोत्कृष्ट प्रायोगिक लघुपटाचा बहुमान प्राप्त झाला असुन हा पूरस्कार प्रसिध्द सिने पत्रकार श्रीकांत कुलकर्णी व दिग्दर्शक-निर्माते म्हणून परिचित असलेले नितिन लचके यांच्या हस्ते देण्यात आला.

'टॉस' या लघुपटात विष्णू उगले यांची मुख्य भुमिका असुन त्यांनी मानसिक संतुलन हरवलेल्या मध्यमवर्गीय पान 3 वर

# नांदुरवेस परिसरातील गटार व रस्त्याचे काम तातडीने व्हावे-नगरसेवक अनिल अष्टेकर

## नांदुरवेस भागातील गटार, रस्ते व सरस्वती नदी स्वच्छतेसाठी मुख्याधिकाऱ्यांची पाहणी



परळी वैजनाथ प्रतिनिधी

प्रभाग क्रमांक 15 चे मा. नगरसेवक अनिल भगवानअप्पा अष्टेकर यांच्या मागणीनुसार नांदुरवेस भागातील भुयारी गटार, रस्ते व सरस्वती नदी स्वच्छतेच्या कामाचा आढावा घेण्यासाठी नगरपरिषदचे मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे साहेब यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

या भेटीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे नगरसेवक रमेश चौंडे यांच्यासह स्थानिक नागरिकांनी देखील सहभाग घेतला. नांदुरवेस भागातील लादण्या व रस्त्याची उंची कमी असल्याने पावसाळ्यात घाण पाणी साचते. ही समस्या दूर करण्यासाठी रस्ता व गटार किमान दोन फूट खोदून काम करावे, अशी मागणी दोन्ही नगरसेवकांनी मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे साहेबांकडे केली. पान 3 वर

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ऐतिहासिक धम्मक्रांती अधिक गतिमान व्हावी- अजयकुमार गंडले



परळी ( प्रतिनिधी) महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची 14 ऑक्टोंबर 1956 साली जी ऐतिहासिक धम्मक्रांती केली. ती धम्मक्रांती अधिक गतिमान व्हावी असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत अजयकुमार गंडले यांनी केले. ते अमरावती जिल्ह्यातील धामणगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यान कार्यक्रमात बोलत होते.

विदर्भातील मैत्रेय बुद्ध विहार ,पृथ्वीराज नगर ,धामणगाव ,जिल्हा अमरावती येथे प्रसिद्ध विचारवंत अजयकुमार गंडले यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी पुढे बोलताना अजयकुमार गंडले म्हणाले की, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपणाला विषमतेच्या खोलातून बाहेर काढले आहे. तसेच सर्व मानव जातीचा कल्याणकारी विचार असलेला विज्ञाननिष्ठ बुद्ध धम्म आपणाला नागपूर येथे ऐतिहासिक अशी धम्मक्रांती करून दिला. धम्मक्रांतीचा ही चळवळ अधिक गतिमान झाली पाहिजे. ती थांबता कामा नये.

बौद्ध धम्माचे अनुकरण करणाऱ्या उपासक, उपासिका यांनी आपल्या जीवनामध्ये त्रिशरण, पंचशील, अष्टांग मार्ग यांचे आचरण केले पाहिजे. म्हणजे जीवनातून दुःखमुक्तीचा पान 3 वर

# शेतकऱ्यांची कर्जमाफी करुन मराठवाड्याला समन्यायी पाण्याचे वाटप झाले पाहिजे - भाई जयंत पाटील

## मराठवाड्यात नवीन युवकांना काम करण्याची संधी मिळणार.




केज ( प्रतिनिधी ) मराठवाडा सातत्याने दुष्काळी झळा सहन करत असतो, तर पश्चिम महाराष्ट्र सह इतर काही भागात महापुरामुळे गावेची गावे पाण्याखाली येतात. वास्तविक मराठवाड्याचे हक्काची समन्यायी पाण्याची मागणी अनेक दिवसांपासून असताना देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे काही लोक केवळ मराठवाड्याला समन्यायी पाणी करण्याच्या केवळ वल्गाणा करून मराठवाड्यातील जनतेला वेड्यात काढण्याचे काम करत आहेत ही बाब शेतकरी कामगार पक्ष कदापी खपवून घेणार नाही तर मराठवाड्याला समन्यायी पाणी वाटप झाल्याशिवाय शेतकरी कामगार पक्ष स्वस्थ बसणार नाही अशी घोषणा शेतकरी कामगार पक्षाचे नेते पान 3 वर

# माऊली दादानी लोकोद्धाराचे काम केले.. महंत प्रकाश महाराज बोधले

## • श्रीक्षेत्र चाकरवाडीत मिनी कुंभमेळा प्रचंड गर्दी



बीड : विसाव्या शतकातील महान संत विभुती ज्ञानेश्वर दादा माऊली यांनी लोकोद्धाराचे काम केले. त्यामुळे आज श्रीक्षेत्र चाकरवाडीत मिनी कुंभ मेळा भरला आहे. संतांच्या आशीर्वादांची शिदोरी आयुष्यभर सरत नाही असे प्रतिपादन प्रकाश महाराज बोधले यांनी केले. दुसर्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुंपताना ते बोलत होते.. यावेळी प्रमुख उपस्थिती महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, महंत महादेव महाराज चाकरवाडीकर श्री ह.भ. प. नारायण भाऊ उत्तरेश्वर पिंपरीकर, ह.भ. प. रामकृष्ण रंधवे बापू, श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह.भ. प. सुरेश महाराज जाधव, श्री ह.भ. प. गणेश महाराज पान 3 वर

# विहिरीत पोहायला गेलेली 9 वर्षाची मुलगीचा बुडून मृत्यू



ही 9 वर्षाची मुलगी जवळच असलेल्या विहिरीत पोहायला गेली असता पाण्यात बुडून तिचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.विहिरी काठोकाठ भरलेली असताना प्रेत वर

केज :- केज तालुक्यातील एकुरका येथे विहिरीत पोहायला गेलेली 9 वर्ष वयाच्या मुलीचा बुडून मृत्यू झाला आहे. या बाबतची माहिती अशी की, दि.9 जून रोजी दुपारी भरत साधु मोरे यांची मुलगी कु. अंजली भरत मोरे

काढण्यासाठी अडचणी येत होत्या. त्या विहिरीवर पाण्याच्या मोटारी लावून पाणी कमी झाल्या नंतर रात्री 9:00 वा. च्या सुमारास प्रेत पाण्याबाहेर काढण्यात पोलिसांना यश आले. दरम्यान पान 3 वर